# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. ३४७५ / शि.वि. / २०१७
दि. ०६ /०१/२०१७

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- गणराज्य दिन समारंभ दि. २६ जानेवारी २०१७(गुरुवार) रोजी उत्साहाने साजरा करण्याबाबत.**
**संदर्भ :- कार्यालयीन परिपत्रक क्र.५८४/शिवि./२०१६ दि.१७.०३.२०१६.**

उपरोक्त विषयानुसार आपणांस सूचित करण्यात येते की, स्वतंत्र भारताचा ६७ वा गणराज्य दिन दि. २६ जानेवारी २०१७(गुरुवार) रोजी मोठया उत्साहाने साजरा करावयाचा आहे. या निमित्ताने आपल्या शाळेत दरवर्षीप्रमाणे विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करावे. सकाळी ६ ते ७ या वेळेत प्रभातफेरीचे आयोजन करावे. या प्रभातफेरीत स्वातंत्र्य वीर व महान विभुतींचे स्मरण करण्यात यावे. राष्ट्रगीत सामूहिकरित्या सुरेल आवाजात गायल्या जाईल याची दक्षता घ्यावी.

ध्वजारोहणाचा कार्यक्रम शासकीय कार्यक्रमाच्या अगोदर घ्यावा. म्हणजे सकाळी ९.०० च्या अगोदर ध्वजारोहणाचा कार्यक्रम पार पाडावा. '' बेटी बचाओ, बेटी पढाओ'' अभियान अंतर्गत ध्वजारोहण शाळेतील हुशार व होतकरू मुलींच्या हस्ते ध्वजारोहण करावे. जेणेकरून मुलींच्या सशक्तीकरणाबाबतचे प्रश्न प्रत्यक्ष अमंलात आणण्यात येत आहेत, हे निदर्शनास येईल. ज्या मुलींच्या हस्ते ध्वजारोहण करावयाचे आहे. तिचे पालक व कुंटूबियांना आदराने आमंत्रित करण्यात यावे व कार्यक्रम स्थळी त्यांची बसण्याची व्यवस्था करावी. ध्वजारोहण करीत असतांना याबाबतचे जे नियम ध्वजसंहीतेमध्ये नेमून दिलेले आहे त्याबाबत काटेकोर पालन करावे. ध्वजारोहण करीत असतांना कोणत्याही प्रकारे राष्ट्रध्वजाचा अपमान होणार नाही व नियमांचा भंग होणार नाही याची काळजी घ्यावी. या कार्यक्रमात शाळा समिती पदाधिकारी व प्रतिष्ठीत नागरीक, विद्यार्थ्यांचे पालक यांना आमंत्रित करावे. कार्यक्रम संपल्यानंतर म.न.पा.तर्फे पुरविण्यात येणाऱ्या खाऊचे वाटप विद्यार्थ्यांना करावे. सुर्यास्तानंतर ध्वज उतरविण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांची राहील. आपण सन्मानपूर्वक ध्वज उतरवावा. ध्वजारोहण कार्यक्रमाचे फोटो व अहवाल कार्यालयास सादर करावा.

(फारूक अहमद खान)
शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

प्रतिलिपी :-

१) मा. उपायुक्त-१,म.न.पा., नागपूर यांना सविनय माहितीस्तव सादर.
२)शाळा निरीक्षक झोन क्र. १ ते १०, नागपूर यांना कार्यवाहीस्तव सादर.

pc:2/reshma/tembhurne /letter T